# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

( **घनकचरा व्यवस्थापन आर/उत्तर विभाग** )

क्र. सहा. अभि. / घकव्य / 8398 / आर/उत्तर दि. 20.02.2024

## <u>जाहिरात</u>

**"आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची साफसफाई व सुविधा"**

विषय:- '**आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम करण्याबाबत.**

आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत "**आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम**" राबविण्याकरीता नव्याने संस्थाची नेमणूक करण्याकरीता आर/उत्तर विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत इच्छुक शासकीय नोंदणीकृत स्थानिक संस्था उदा. कामगार सहकारी संस्था/ सहकारी सेवा संस्था/ अशासकीय संस्था / बेरोजगार संस्था (या सर्व संस्थांचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा )/ नोंदणीकृत उपक्रमे (कंपनी) यांच्यामार्फत **आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची** सफाईसाठी दि**. 01.03.2024** ते दि**. 31.07.2024** या कालावधी करिता मोहोरबंद ईच्छापत्र मागवित आहोत**.**

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरीता निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1 | **"आर/उत्तर विभाग जुने कार्यालयाची साफसफाईची कामे व सुविधा पुरविण्याचे काम"** | **01** संस्थाच्या (3 एकक) |

अर्जाचा नमुना आणि याबाबतची नियमावली, आर/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांच्या कार्यालयात **दि.20.02.2024** ते **दि.26.02.2024** या कालावधीत, सकाळी 10.30 ते दुपारी 4.30 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या / नोंदणीकृत उपक्रमे (कंपनी) यादी मधुन सोडत काढण्यात येइल. सदर सोडती मध्ये यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप, विभागाचे सहाय्यक आयुक्त, योजनेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार करतील कामाचा कालावधी दि. **01/03/2024** ते दि. **31/07/2024** या कालावधीकरिता किंवा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालया मार्फत सदर योजना राबविण्याबाबत नव्याने निर्देश देण्यात येतील, त्यानुसार संस्थांनी स्वच्छतेचे काम करावे लागेल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/उत्तर विभाग घनकचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी.

संस्थेने आर/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. **27.02.2024** (दुपारी **2.00** वाजे पर्यंत). नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'आर/उत्तर' विभाग**